REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# पं. बाळासाहेब पूंछवाले यांचे ग्वाल्हेर गायिकीमधील सांगीतीक योगदान

प्रा. नेत्रा गजाननराव मानकर
सहाय्यक प्राध्यापक , श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला.




## प्रस्तावना.

हिन्दुस्थानी संगीताचा सगळयात अधिक प्रचार तथा प्रसार ग्वाल्हेरमधेच झाला. ग्वाल्हेर घरण्याला संगीताची जननी मानले जाते. ग्वाल्हेर घराण्याचे मुळ पुरूष नथ्थन पीरबख्श पासून ग्वाल्हेर घराण्याचे पं. शंकरराव पंडित, पंडित राजाभैय्या पुंछवाले तसेच अधिक महत्वाचे म्हणजे पं. राजाभैय्या पुंछवाले यांचे पुत्र तसेच ग्वाल्हेर घराण्याचे जेष्ठा गायक पं बाळासाहेब पुंछवाले यांच्या संपूर्ण जीवनाचा परिचय, तसेच त्यांना मिळालेले सांगीतीक शिक्षण, तयांचे सांगीतीक कार्य त्यांचे वैवाहिक जीवन तसेच पं बाळासाहेब पुंछवाले यांच्या लिहिलेले ग्रंथ. त्यांच्या बंदिशी यांचे चिकित्सक अध्ययन प्रस्तुत शोधकार्यामध्ये केल्या गेले.

ग्वाल्हेर संगीत पंपरेचा विचार केला तर असे लक्षात येते की, 19 व्या शतकामधे या परंपरेला सुरवात झाली परंतू त्याही अगोदर त्तोमर काळ मोगल काळ, मराठा काळ तसेच सिधीया घराण्यामधे सुध्दा ग्वाल्हेर परंपरा प्रसिध्द होती आणि याच श्रेष्ठ परंपरेला शंकरराव पंडित, पं. राजाभैय्या पुछवाले तसेच पंडित बाळासाहेब पुछवाले यांनी पुढे नेले.

10 जानेवारी 1918 रोजी पं. भातखंडेनी ग्वाल्हेर ला माधव संगीत विदयालयाची स्थापना केली व संयोगाने 15 डिसेंबर 1918 रोजी पं बाळासाहेब पुछवाले यांचा जन्म् झाला. पं बाळासाहेब यांनी ग्वाल्हेर मधे स्थापना झालेल्या माधव संगीत विदयालयातील संगीत शिक्षकाच्या नोकरीपासून तर महाविदयालयाती प्राचार्य पर्यंत सर्वच पदावर काम केले. यादरम्यान पंडितजींचे अनेक शिक्ष्य तयार झाले. जे आजही ग्वाल्हेर घराण्याची परंपरा पुढे नेत आहेत. पंडितजींचे सर्वात महत्वपूर्ण कार्य म्हणजे त्यांचा ग्रंथ "मै जैसा भी हूॅं" या ग्रंथामुळे हिन्दुस्थानी संगीता मधे तसेच ग्वाल्हेर घराण्याच्या सांगीतीक परंपरेतील कलाकरांना तसेच विदयार्श्याना काही नविन शिकण्याची संधी मिळाली पंडितजींनी अनेक स्वयंनिर्मित राग जसे ललित रंजनी शुध्द सोहनी जश्या रागांच्या १ वंदिशी सुद्धा प्रकाशित केल्या. तसेच ग्वाल्हेर घराण्याचे पारंपारिक रागांच्या बंदिशी कमी असल्याकारणाने पंडितजींनी पारंपारिक रागांच्या बंदिशीचे देखिल निर्मिती केली पं. बाळासाहेब पुछवालेनी अनेक मोठ मोठया संगीत महोत्सवामध्ये आपली प्रतिभा दाखविली. या सर्व गोष्टींचे वर्णन प्रस्तुत संशोधनामध्ये केल्या गेले आहे.

## पंडितजींचे बालपण व संगीत शिक्षण :–

पंडित बाळासाहेब पुछवाले यांचा जन्म् 15 डिसेंबर 1918 रोजी ग्वाल्हेर मधे झाला. त्यांचे पिता ग्वाल्हेर घराण्याचे प्रसिद्ध गायक पं राजाभैय्या पुंछवाले होते तसेच त्यांच्या आईचे नाव वेणूताई होते त्यांच्या जन्माच्यावेळी त्यांचे पिता पं राजाभैय्या एक सामान्य गायक, हार्मोनियम वादक तसेच व्यवसायाने एक बाबू होते. पंडितजींने नाव

पांडूरंग होते परंतू त्यांना पुढे बाळासाहेब या नावानेच ओळखले जावू लागले.

पंडितजींच्या घरामधेच सांगीताचे वातावरण होते. त्यांचे पिता पंडितजीचे संगीताचे प्राथमिक शिक्षक वयाच्या १५ व्या वर्षी पासून सूरू झाले. त्यांचे प्राथमिक गुरू पं. राजाभैय्या यांचे शिष्य पं. सदाशिवराव अग्निहोत्री होते त्यांच्याजवळ व पंडितजींनी पाच वर्षे संगीताचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यानी आपले पिता प. राजाभैय्या यांच्याकडून पुढिल संगीताचे शिक्षण पूर्ण केले. पंडितजींनी त्यांच्या वडिलांकडून संगीताची प्रत्येक शिक्षा प्राप्त् केली. त्यांनी ग्वाल्हेर घराण्याच्या अनेक बंदिशी, स्वरविस्तार रागांची शुध्दात या सर्व गोष्टींनी ज्ञान राजाभैय्यांनी बाळासाहेबांना दिले. पंडित बाळासाहेब यांनी दोन प्रणालींनी संगीताचे शिक्षण घेतेल त्यात पहिली भातखंडे शिक्षण पद्धती आणि दुसरी घराणेदार संगीत पद्धती पं बाळासाहेबांना दिले. पं भातखंडे जींना आपले गुरू मानले होते. पं बाळासाहंब संगीत जिवनाला पं. भातखंडे पं रातांजनकर यांच्या कडून प्रेरना व प्रोत्साहन मिळाले. परन्तु ग्वाल्हेर घराने ची घरानेदार संगीत शिक्षण चा आरंभ त्यांच्या वयाच्या 15 वर्षानंतर पं. राजाभैय्या कडूनच झाला. याचा भरपूर उपयोग झाला.

### टप्पा गायकीचे पुनरूज्जीवन :—

ज्याप्रमाणे ध्रुपद ,धमार हा प्रबंध प्रकाश समृद्ध आहे. त्याचप्रमाणे टप्पा गायकी पण एक उत्त्र प्रबंध प्रकार आहे, टप्पा गायकी नष्ट गायकी शिकविणायांचा प्रभाव असल्याकारणाने आज ही गायकी नष्ट होत चालली आहे. परन्तु आपण बघितले तर पंडितजींनी याच गायकी चा प्रचार करून टप्पा गायकी पुनरूज्जीवित केली इतर प्रदेशामध्ये गायले जाणारे टप्पा प्रबंध प्रकाश् पेक्षा ग्वाल्हेरी टप्पा कसा वेगळा आहे हे त्यांनी आपल्या वेगळ्या शैलीच्या परिणामकारक ढंगाने दाखवून दिले. बनारस आणि उलकत्ता मधे सुद्धा टप्पा गायला जातो. परंतु बनारस आणि कलकत्ता च्या टप्पा गायनापेक्षा ग्वालियरी टप्पा वेगळा आहे.

### पंडितजींची शिष्य परंपरा :—

पंडितजी जसे एक चांगले गायक कलाकार होने तसे ते एक उत्तम अध्यापक आणि गुरु होते. पंडितजींची शिष्य परंपरा विशाल होती पंडितजी अत्यंत निर्मळ भावनेने आपल्या शिष्यांनी शिकवित असत ज्याने शिष्यांच्या मनामध्ये त्यांच्याप्रती एक आदर होता.त्यांच्या शिष्यांमधे डॉ. प्रभाकर गोहदकर, विश्वनाथ गवांदे सज्जनलाल भट, महेश बाजपेयी, डॉ. अरुण बांगरे, डॉ. जयंत खोत, माधव आफळे, रागिनी पुरंदरे ,रंजना टोणपे, शाश्वती मंडल, प्रभाकर देवले, डॉ अरुण धर्माधिकारी यांचा समावेश आहे.

### पंडितजींची सांगीतीक परिक्रमा :—

बाळासाहेबांनी पं. राजाभैय्या यांच्याकडून ग्वाल्हेर घराण्याचे शिक्षण घेतले. तसेच त्यांच्यावर पं भातखंडे व रातांजनकर यांचा देखील प्रभाव होता. संगीत क्षेत्रातील या तिनही विभुतीच्या कृपाप्रसादाने बाळासाहेबांचे सांगीतीक जिवनाचा मार्ग सुगम झाला.

बाळासाहेबांनी माधव संगीत विदयालयात संगीत शिक्षकाची नौकरी स्विकरून तिथेच विद्यार्जन चे काम सूरू केले. काही काळानंतर पंडितजी माधव संगीत विदयालयाचे पंडितजींना 1955 साली आकाशवाणीद्वारा गायक म्हणून मान्यता मिळाली तसेच अनेक संगीत सभांमधे पंडितजींचे गायन होवू लागले. त्यातच त्यांचे अनेक शिष्य तयार झाले.

### पं. बाळासाहेब पुछवाले यांचे शास्त्रीय संगीतात योगदानः—

प. शास्त्रीय संगीतामधे खुप मोठे योगदान आहे. त्यांचे 'मै जैसा मी हू' हा आत्मचरित्रपर ग्रंथ आहे. या ग्रंथामधे पंडितजींच्या जिवनातील प्रसंगाचे तसेच त्यांच्या अनेक बंदिशी प्रकाशित केल्या आहेत. पंडितजीनी या ग्रंथामध्ये अनेक अप्रचलित राग तसे देवरंजनी जोग, जोगकौस, शहाणा, नटभैरव, धानी, चंचल मल्हार, चंद्रकौस, गैरीशंकर, गोपीवसंत, ललितरंजन, शुध्द सोहनी अशा अनेक रागांच्या बंदिशी या ग्रंथात प्रकाशीत केल्या ज्याने, पुढे जाऊन गायकांना तसेच संगीत अभ्यासकांना खुप मदत झाली.

## निष्कर्ष :–

पं. बाळासाहेब पुछवाले यांनी पं. राजाभैय्या यांच्या कडुन मिळालेल्या सांगीतीक वारसा वर निर्भर न राहता स्वकर्तृत्व् तसेच समर्पित भावनेने ग्वाल्हेर घरान्याच्या परंपरेमधे खुप मोठे योगदान दिले आहे, ग्वाल्हेर घराण्याचे प्रतिनिधित्व करण्यार्‍यांमध्ये जे गायक वादक होते त्यामधे बाळासाहेबांचे नाव अग्रणी होते. त्यांनी अनेक गुढ गोष्टींची उकल करण्यासाठी पं. बाळासाहेब हे एकमेव आधारभूत व्यक्तीमत्व् होत. संगीत प्रचार तथा प्रसाराच्या दृष्टीने तसेच ग्वाल्हेर घरण्याच्या श्रेष्ठ परंपरेचे प्रतीक बनून त्यांनी आपली प्रतिभा अजूनच श्रेष्ठ बनविली पंडितजींनी ग्वाल्हेर घराण्याच्या गायकी ला श्रेष्ठ तसेच जेष्ठ कलाकरांच्या मार्गदर्शनात आत्मसात करून ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीला अधिक उंचीवर नेऊन ठेवले.

## संदर्भ ग्रंथ सुची :–

१. "मै जैसा भी हूॅं दृ पं बाळासाहेब पुंछवाले
२. संगीत कला विहार अंक